# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in
वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in


**प्रकरण क्र. १३६/२०१४** **दिनांक : ३० मार्च, २०१५**

## जाहीर नोटीस

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत पारेषण परवान्यामध्ये सुधारणा करण्यासाठी मेसर्स अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड यांचा अर्ज**

१. मेसर्स अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेड (एटीआयएल) (पूर्वीची अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड) यांनी, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ आणि सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ अंतर्गत त्यांना मंजूर केलेल्या अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लिमिटेडच्या (सन २००९ चा परवाना क्र. २), पारेषण परवान्यामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (मविनिआ) अर्ज केला आहे.

२. उपरोक्त अर्जदाराने, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८(२) (अ) अंतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे, त्यांच्या सदर अर्जाची नोटीस दि. १६ जानेवारी, २०१५ रोजी (१) इंडियन एक्सप्रेस, नागपूर आवृत्ती (इंग्रजी); (२) लोकमत टाइम्स, नागपूर आवृत्ती (इंग्रजी); (३) लोकसत्ता, नागपूर आवृत्ती (मराठी); (४) दैनिक देशोन्नती, गोंदिया आवृत्ती (मराठी) मध्ये प्रसिध्द केली होती.

३. प्रसिध्द झालेल्या नोटीशीच्या अनुषंगाने, सदर पारेषण परवान्यात सुधारणा करण्याबाबतच्या अर्जासंबंधात कोणत्याही सूचना आणि हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

४. उपलब्ध माहिती विचारात घेतल्यावर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, मे. एटीआयएल यांना मंजूर झालेल्या सन २००९ च्या पारेषण परवाना क्र. २ मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ मध्ये सन २००६मध्ये केलेल्या सुधारणांना अनुसरुन संबंधित पायाभूत सुविधांसह खालील पारेषण वाहिन्यांचा विकास आणि संचालन करण्यासाठी, खाली दिल्याप्रमाणे व्याप्तीमध्ये अल्प-बदल करुन, सुधारणा/फेर-बदल करता येतील :

| विद्यमान पारेषण क्षेत्र | प्रस्तावित सुधारित पारेषण क्षेत्र |
| --- | --- |
| • तिरोडा (गोंदिया) ते ४०० केव्ही वरोरा स्विचिंग केंद्रापर्यंत क्वॉड कंडक्टरसह ४०० केव्ही डबल सर्किट पारेषण वाहिनी;<br>• तिरोडा प्रकल्प स्विचयार्ड येथे वरील तिरोडा-वरोरा डबल सर्कीट पारेषण वाहिनीसाठी ४०० केव्ही बेज, संख्या २<br>• वरोरा स्विचिंग केंद्र येथे तिरोडा-वरोरा डबल सर्कीट पारेषण वाहिनीसाठी ४०० केव्ही बेज, संख्या २ | • तिरोडा (गोंदिया) ते ४०० केव्ही वरोरा स्विचिंग केंद्रापर्यंत क्वॉड कंडक्टरसह ४०० केव्ही डबल सर्किट पारेषण वाहिनी;<br>• तिरोडा प्रकल्प स्विचयार्ड येथे वरील तिरोडा-वरोरा डबल सर्कीट पारेषण वाहिनीसाठी ४०० केव्ही बेज, संख्या २<br>• वरोरा स्विचिंग केंद्र येथे तिरोडा-वरोरा डबल सर्कीट पारेषण वाहिनीसाठी ४०० केव्ही बेज, संख्या २<br>• **तिरोडा उप-केंद्र येथे संलग्न बेजसह २ x ८० एमव्हीएआर बस रिॲक्टर्स** |

५. कोणत्याही व्यक्तीस, मे. एटीआयएल च्या अर्जाच्या प्रतीसह त्यांचे जोडपत्र आणि सहपत्र www.mercindia.org.in/ www.merc.gov.in या आयोगाच्या संकेत-स्थळावर किंवा ठरवून देण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येतील.

६. मे. एटीआयएल यांनी दाखल केलेल्या अर्जावर हरकती आणि अभिप्राय/सूचना दाखल करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीने आपले निवेदन इंग्रजी किंवा मराठीत, (६+१) प्रतींमध्ये आयोगाच्या सचिवास पाठवावे आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. सूचना आणि/किंवा हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास त्यात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **दि. ७ मे, २०१५ रोजी ११.३० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात होणाऱ्या सुनावणीच्या वेळी,** जेव्हा मे. एटीआयएलचा परवान्यात सुधारणा करण्याबाबतचा वर उल्लेख केलेला अर्ज विचारात घेण्यात येईल तेव्हा, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल व त्यासाठी वेगळी नोटीस देण्यात येणार नाही.

दिनांक : ३० मार्च, २०१५

ठिकाण : मुंबई

सचिव, मविनिआ